**आर.सी.सी.क्रं.१६५/२०२२**
**<u>नि.१६ लगत</u>**

**सरकारतर्फे सा.क्र. 1 चा उलटतपास**
**शपथेवर सुरू -**
**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. के.बी.शिंदे यांचे मार्फत -</u>**

मी आजरोजी मौजे उंबरगाव ता. श्रीरामपुर येथे कार्यरत आहे. माझे मुळ गाव बेलपिंपळगाव ता. नेवासा आहे. सन २०21 साली मी मौजे घोगरगाव ता. नेवासा येथे कार्यरत होतो. घोगरगाव ते टाकळीगाव यांची शिव एकच आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्याद पोलिसांच्या सांगण्यावरून दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची व माझी जुनी ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद मी खोट्या माहितीच्या आधारे दिली. हे म्हणणे खरे नाही की, कोटा पुर्ण करण्यासाठी आम्ही गौण खनिज कायद्या अंतर्गत केसेस दाखल करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा ट्रॅक्टर शेतात होता, तो आम्ही पकडुन आणला. हे म्हणणे खरे नाही की, मी घ टनास्थळाचा पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, शासकीय नियमाप्रमाणे दरवर्षी आम्हाला वाळुचा कोटा पुर्ण करावयाचा असतो त्यामुळे मी प्रस्तुतची केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

सही/-

**( श्रीमती.ए.एन.सरक )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.३ नेवासा

दिनांक :०९/०३/२०२६